| MHLA130004152022 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १४.०३.२०२२ | | |
| | नोंदणी दिनांक | : | १४.०३.२०२२ | | |
| | निकाली दिनांक | : | ०६.०७.२०२६ | | |
| | कालावधी | : | **व.** | **म.** | **दि.** |
| | | | **०४** | **०३** | **२२** |

**न्यायदंडाधिकारी वर्ग १ (न्यायालय क्र.१) रेणापूर ता.रेणापूर जि. लातूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती पी.ए.आपटे)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.४०/२०२२**
**(निशाणी क्र.२५ )**

(रेणापूर पोलीस स्टेशन,गु. र. नं.४६५/२०२१, भा.द.वि.कलम २७९,३०४(अ), मो.वा.का.कलम १८४, १३४/१७७ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | – | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, रेणापूर पोलीस स्टेशन |
| अभियोगपक्षातर्फे | – | श्री. डी.बी.सारुळे सहा. सरकारी अभियोक्ता. |
| तक्रारदार | – | **रोहिदास फुलसिंग राठोड**<br>वय– ३८ वर्ष, धंदा– शेती,<br>रा.कोळगाव तांडा, ता. रेणापूर, जि. लातूर. |
| आरोपी | – | **१.दिपक नामदेव गुरव,**<br>वय –३१ वर्ष, धंदा –चालक,<br>रा.चिंचोली माळी, ता.केज, जि.बीड,<br>ह.मु. खांडवे नगर, लोहगाव, पुणे. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | – | श्री.एस.बी.साळवे. |
| गुन्हा घडल्याची तारीख | – | दि.११.११.२०२१ |
| प्रथम खबरची तारीख | – | दि.११.११.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | दि.१४.०३.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | – | दि.०४.१२.२०२४ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | – | दि.१३.०१.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | – | नाही. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | – | दि.०६.०७.२०२६ |
| शिक्षा असल्यास, आदेशाचा दिनांक | – | नाही. |

## (आरोपींचा तपशिल)

| .क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान तुरुंगात असल्यास तो कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **दिपक नामदेव गुरव** | फौ.प्र.सं.कलम ४१(१)(अ) अन्वये नोटीस | फौ.प्र.सं.कलम ४१(१)(अ) अन्वये नोटीस | भा.द.वि.कलम २७९,३०४अ व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |

### (अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी)

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची भुमीका |
|---|---|---|
| सा.क्र.१ | विमल देवीदास राठोड | साक्षीदार |

### (अभियोग पक्षाचे कागदपत्रे )

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | ---- | ---- |

### (आरोपी पक्षाचे कागदपत्रे )

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | -- | -- |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ०६/०७/२०२६ रोजी अधिघोषित)

१. सदरच्या खटल्यामध्ये आरोपीविरुध्द भा.द.वि.कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.

**सरकार पक्षाची फिर्याद थोडक्यात खालील प्रमाणे –**

०२. दि.११.११.२०२१ रोजी फिर्यादी सायंकाळी ६.०० वाजेच्या सुमारास

त्यांच्या घरी होते, तेव्हा रोडवर जोरात अपघातचा आवाज आला. त्यावर ते घराचे बाहेर येवून हायवे रोडककडे पाहिले असता कोणीतरी रोडवरील माणसाने भाऊ देवीदास याचा अपघात झाल्याचे ओरडून सांगितले. त्यावेळी ते पळत गेले व पाहिले असता त्यांचा भाऊ देवीदास हा हायवे रोडवर डिव्हायडरजवळ डोके असा पडला होता. त्याच्या डोक्यातून व कानातून रक्त येत होते व तो काहीच हालचाल करत नव्हता. तेव्हा तेथे असलेल्या आकाश राठोड व प्रविण राठोड यांनी सांगितले की, दोवीदास रोड क्रॉस करुन घराकडे येत असताना अंबाजोगाईकडून एक पांढऱ्या रंगाची स्वीफट डिझायर कार क्र.एम.एच.१२/एनबी.२३०५ ही भरधाव वेगात आली व तिने देवीदासला धडक दिली, त्यात देवीदस खाली पडला, सदर कार चालक कार न थांबवता पळून गेला. त्यानंतर अंबुलन्स आली. अंबुलन्समधील डॉक्टरांनी देवीदासला तपासून तो मयत झाल्याचे सांगितले. आरोपीने हयगईने, निष्काळजीपणे वाहन चालवून देवीदस फलसिंग राठोड यांच्या मृत्युस कारणीभूत झाला. त्यामुळे फिर्यादीने आरोपी विरुद्ध प्रस्तुतची तक्रार दाखल केली.

०३. पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीप्रमाणे आरोपीविरोधात भारतीय दंड विधान कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये गुन्हा रजिस्टर नंबर ४६५/२०२१ नोंदविण्यात आला. त्याप्रमाणे तपासी अंमलदार यांनी गुन्ह्याचा तपास केला असता तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले, मयताचे मृत्युप्रमाणपत्र, वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि गुन्ह्याचा तपास पुर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पूर्वअधिकारी यांनी आरोपीविरोधात भारतीय दंड विधान कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये नि. १४ दोषारोप निश्चित करुन नोंदविले आणि ते आरोपीने समजावुन सांगितले. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन न्यायालयाला केस चालविण्याची विनंती केली. त्यानंतर सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ – नि.क्र.१७ वर विमल देवीदास राठोड यांना तपासले. नि.क्र.१ वरील आदेशानुसार सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द पुरावा आला नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ नुसार निवेदन नोंद करण्यात आले नाही.

०५. सरकार पक्षाचे आरोपीविरुद्धचे आरोप पाहता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यावरील कारणांसहित निष्कर्ष त्यांच्यासमोर दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.११.११.२०२१ रोजी सायंकाळी ६.०. वाजताच्या सुमारास मौजे कोळगाव तांडा, ता.रेणापूर येथील अंबाजोगाई जाणारे रोडवर आरोपीने त्याचे ताब्यातील स्वीफट कार गाडी क्र.एम.एच.१२/एनबी–२३०५ हे अविचाराने, हयगयीने, रस्त्याची विशिष्ट परिस्थिती लक्षात न घेता चालवून देवीदास राठोड यांना धडक देवून अपघात केला आणि भारतीय दंड विधान कलम २७९ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय ? | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन अविचाराने, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगईने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन देवीदास फुलसिंग राठोड यांचे मृत्युस कारणीभूत झाला आणि भारतीय दंड विधान कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय ? | ...नाही. |
| ३. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन रस्त्याची विशिष्ट परिस्थिती लक्षात न घेता अविचाराने, हयगयीने चालवून अपघात केला आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय ? | ...नाही. |
| ४. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन रस्त्याची विशिष्ट परिस्थिती लक्षात न घेता अविचाराने, हयगयीने, चालवून अपघात केला व अपघताची खबर नजीकच्या पोलीस स्टेशनला न देता निघून गेला आणि मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने हे सिद्ध केले आहे काय ? | ...नाही. |
| ५. | अंतिम आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## **<u>–: का र ण मि मां सा :–</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत:–</u>**

०६. सरकारी पक्षाचे असे कथन आहे की, दि.११.११.२०२१ रोजी फिर्यादी सायंकाळी ६.०० वाजेच्या सुमारास त्यांच्या घरी होते, तेव्हा रोडवर जोरात अपघातचा आवाज आला. त्यावर ते घराचे बाहेर येवून हायवे रोडकडे पाहिले असता कोणीतरी

रोडवरील माणसाने भाऊ देवीदास याचा अपघात झाल्याचे ओरडून सांगितले. त्यावेळी ते पळत गेले व पाहिले असता त्यांचा भाऊ देवीदास हा हायवे रोडवर डिव्हायडरजवळ डोके असा पडला होता. त्याच्या डोक्यातून व कानातून रक्त येत होते व तो काहीच हालचाल करत नव्हता. तेव्हा तेथे असलेल्या आकाश राठोड व प्रविण राठोड यांनी सांगितले की, दोवीदास रोड क्रॉस करुन घराकडे येत असताना अंबाजोगाईकडून एक पांढऱ्या रंगाची स्वीफट डिझायर कार क्र.एम.एच.१२/एनबी.२३०५ ही भरधाव वेगात आली व तिने देवीदासला धडक दिली, त्यात देवीदस खाली पडला, सदर कार चालक कार न थांबवता पळून गेला. त्यानंतर अंबुलन्स आली. अंबुलन्समधील डॉक्टरांनी देवीदासला तपासून तो मयत झाल्याचे सांगितले. आरोपीने हयगईने, निष्काळजीपणे वाहन चालवून देवीदस फलसिंग राठोड यांच्या मृत्युस कारणीभूत झाला व त्यायोगे भादवी कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये गुन्हा केला. त्यामुळे सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या सर्व साक्षीदारांचे पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे.

०७. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ विमल देवीदास राठोड हिने आपल्या सरतपासामध्ये अपघातातील कार कोण चालवित होते, सदर कारचा क्रमांक काय होता हे तिला सांगता येणार नाही, असे कबूल केले आहे. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य होईल अशी साक्ष न दिल्याने सदर साक्षीदारास फितुर घोषित करुन सरकारी वकीलामार्फत उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु सदर प्रश्नादरम्यानदेखील आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होईल असे कोणतेही कथन अभिलेखावर आणण्यात आलेले नाही.

०८. सरकारपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्याबाबत कोणतीही पुर्तता करण्यात न आल्यामुळे नि.१ वर आदेश पारीत करुन सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले असता सदर साक्षीदाराने आरोपी आपले ताब्यातील वाहन हयगईने, निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवून फिर्यादीचा भाऊ देवीदास राठोड यास धडक देऊन अपघात केला व त्याच्या मृत्युस कारणीभूत ठरला असे सांगितलेले नाही. सरकार पक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. घटनेची सत्यता पडताळण्याकरीता प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर येणे गरजेचे होते. परंतु वारंवार संधी देवूनही सरकार पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराची साक्ष पाहता आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन पांढऱ्या रंगाची स्वीफट डिझायर कार क्र.एम.एच.१२/एनबी.२३०५ भरधाव वेगात, हयगई व निष्काळजीपणे चालवून देवीदास राठोड यांना धडक देवून त्यांच्या मृत्युस कारणीभूत ठरला हे सिध्द होत नाही. मुळात सरकार पक्षातर्फे फिर्याद शाबीत झालेली नाही. त्यामुळे सरकारपक्ष आरोपीविरुध्द भादवी कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये गुन्हा सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे अशा मतास मी येत आहे. यास्तव मी मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.५ करीता</u> –**

१०. मुद्दे क्र. १ ते ४ चे नकारार्थी उत्तरामुळे आरोपी हा भारतीय दंड विधान कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ अन्वये निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरलेला आहे. या निष्कर्षासह मुद्दा क्र. १ ते ५ चे उत्तर समर्थनार्थ खालील आदेश पारित करण्यात

येत आहे.

## आदेश

१. आरोपी दिपक नामदेव गुरव फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) व भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अनुसार भारतीय दंड विधान संहिता कलम २७९,३०४(अ) व मोवाका १८४, १३४/१७७ प्रमाणे गुन्हा केल्याचे आरोपांमधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन न्यायालयाच्या स्वाधीन करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.)

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.07.06 16:16:26 +0530

**ठिकाण–रेणापूर** **( पी.ए.आपटे )**

दिनांकः ०६/०७/२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रेणापूर**